
# कृ. ब. निकुंब :
# व्यक्तित्व आणि कवित्व



Scanned by CamScanner



डॉ. विवेकानंद ससाणे यांनी पुणे विद्यापीठातून पीएच.डी. पदवी घेतली आहे. मुलतःच त्यांना कवितेविषयी आवड आहे. त्यांचा 'आकाश' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. स्थानिक साप्ताहिकातून त्यांनी तुकारामांच्या अभंगांवर 'अभंगवाणी' हे सदर लिहिले आहे. पीएच. डी. पदवीसाठी त्यांनी 'कृ. ब. निकुंब यांची कविता : एक अभ्यास' या विषयावर संशोधन पूर्ण केले. आवडीच्या विषयात संशोधन करण्याची संधी उपलब्ध झाल्याने त्यांनी निकुंबांच्या कवितेचा वेगवेगळ्या दृष्टीने सखोल अभ्यास केला. या कवितेच्या विविध वैशिष्ट्यांसह कृ. ब. निकुंबांच्या वाङ्‌मयीन व्यक्तिमत्वाचे अनेक रंगछटांसह सलग साकार रुप मांडले. या संशोधन प्रबंधाचे 'कृ. ब. निकुंब : व्यक्तित्व आणि कवित्व' हे ग्रंथरुप होय.

निकुंबांच्या कवितेचा आस्वादक अभ्यास करीत असताना डॉ. ससाणे यांनी काव्य विषयक विविध समीक्षा- संदर्भग्रंथांचा अभ्यास केला आहे. त्याचबरोवर काव्यविषयक काही नाविन्यपूर्ण मते ही नोंदविली आहेत. समकालीन कवी आणि कवितेचाही या निमित्ताने अभ्यास या ग्रंथात झाला आहे. खंडकाव्यप्रकाराचाही या ग्रंथात समावेश केला गेला आहे. कृ. ब. निकुंब यांनी केलेली समीक्षा व त्यावरील मते यांचाही समावेश या ग्रंथात आहे. परिणामतः मराठी कवितेच्या संदर्भातील एक उपयुक्त ग्रंथ जिज्ञासू अभ्यासकांना उपलब्ध होईल यात शंका नाही.

मल्हार प्रकाशन

Scanned by CamScanner

# कृ. ब. निकुंब :
# व्यक्तित्व आणि कवित्व

डॉ. विवेकानंद ससाणे

सत्यम् शिवम् सुंदरम्

मल्हार प्रकाशन
पुणे.

Scanned by CamScanner

मल्हार प्रकाशन,
समीक्षा
प्रकाशन क्र. ४
© मल्हार प्रकाशन

❀❀❀

प्रकाशक :
मल्हार प्रकाशन
३११/३, ससाणेनगर, हडपसर
पुणे -४११०२८.
दूरभाष : ६८१०७००

❀❀❀

अक्षर जुळणी आणि मुद्रण :
भाग्योदय एन्टरप्रायझेस, हडपसर
दूरभाष : ६८२३१६८

❀❀❀

प्रथमावृत्ती : २००३
❀❀❀
मुखपृष्ठ :
प्रवीण
मल्हार प्रकाशन
किंमत : १८० रुपये

Scanned by CamScanner

## ॥ ..... इदं न् मम् ॥

नवकाव्याच्या ऐन कोलाहलातही आपल्या, स्निग्ध, कोमल व भावमधुर गीतांनी रसिकांच्या मनाला मोहिनी घालणारे भावकवि म्हणून कवी कृ. ब. निकुंब सर्वपरिचित आहेत. कवी निकुंब आपल्या 'घाल घाल पिंगा वाऱ्या' या भावगीताने घरोघर पोहोचले. या लोकप्रिय कवीने १९४५ ते १९८९ या दीर्घ कालखंडात काव्याची अविरत साधना केली. त्यांचे उज्ज्वला,उर्मिला, अनुबंध,अभ्र, पंखपल्लवी असे एकापेक्षा एक सरस काव्यसंग्रह या कालखंडात प्रकाशित झाले. 'मृगावर्त' या अनेकांगी वैशिष्ट्यपूर्ण ठरलेल्या खंडकाव्याची निर्मिती त्यांनी केली. साय साखर, ऐन पहाटे, पावसाचे घर यांसारखे दर्जेदार बालगीतसंग्रह त्यांनी लिहिले. काव्यनिर्मितीबरोबरच प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन व समकालीन काव्याची समीक्षाही त्यांनी केली. काव्याच्या प्रांतात असे विपुल लेखन करणाऱ्या निकुंबांचे साहित्य मात्र दुर्लक्षित राहिले. नवकाव्याचे गुणदोष शोधण्यात मग्न राहिलेल्या तत्कालीन समीक्षेच्या दृष्टीस बेळगावसारख्या सीमावर्ती भागात निर्माण होणारी ही भावसंपन्न व गुणसंपन्न कविता पडू शकली नाही. निकुंबांच्या काव्यावर फारच अल्पस्वल्प व उथळ स्वरूपाचे लेखन आतापर्यंत झालेले होते. ही उणीव थोड्याफार प्रमाणात का होईना भरून काढण्याच्या दृष्टिकोनातून 'कृ. ब. निकुंब यांची कविता : एक अभ्यास' हा प्रबंध पुणे विद्यापीठास सादर केलेला होता. हा प्रबंध रसिक जिज्ञासूंसाठी पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे.

प्रस्तुत ग्रंथात निकुंबांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा व त्यांच्या कवित्वाचा शोध घेतलेला आहे. निकुंबांच्या काव्यविषयक कल्पना व्यक्त करणाऱ्या कविता, व्यक्तिगत भावभावना व्यक्त करणाऱ्या कविता, प्रेम कविता, सामाजिक आशयाच्या कविता, गूढतेच्या गहन प्रांतात प्रवेश करणाऱ्या कविता, स्त्री गीते, बालगीते इ. काव्याचा आशयदृष्ट्या अभ्यास केलेला आहे. पौराणिकता आणि आधुनिकता यांचा दुहेरी गोफ गुंफणाऱ्या 'मृगावर्त' या खंडकाव्याच्या विविध पैलूंचाही या निमित्ताने अभ्यास झालेला आहे.निकुंबांच्या समकालीन काव्यप्रवाहाचा स्थूल विचार या ग्रंथात झालेला आहे. निकुंबांच्या काव्यसमीक्षेचा अभ्यास करताना निकुंबांच्या विविध मतांचा, विचारांचा परामर्श प्रस्तुत ग्रंथात घेतलेला आहे. त्यामुळे हा ग्रंथ पदवी व पदव्युत्तर पातळीवर काव्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच काव्याच्या संशोधकांना निश्चितच उपयुक्त ठरेल.



Scanned by CamScanner

कवी कृ. ब. निकुंब यांचे प्रबंधाच्या लेखन काळातच निधन झाले अखेरच्या काही वर्षामध्ये निकुंबांना स्मृतिभ्रंशाने ग्रासले होते. त्यामुळे त्यांची मुलाखत घेणे शक्य झाले नाही. परंतु निकुंबांच्या पत्नी श्रीमती शकुंतला निकुंब तसेच त्यांचे पुत्र श्रीकांत निकुंब व रवींद्र निकुंब यांच्याशी झालेल्या चर्चेतून व पत्रव्यवहारातून निकुंबांचे व्यक्तिमत्त्व उलगडत गेले. निकुंबांच्या कुटुंबियांनी केलेल्या या सहकार्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो.

या प्रबंधासाठी व ग्रंथासाठी पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रपाठक डॉ. अविनाश आवलगावकर यांनी मोठ्या आपुलकीने मार्गदर्शन केले. 'सरस्वती मंदिर नाईट कॉलेज'चे प्राचार्य डॉ. रमेश आवलगावकर यांनीही वेळोवेळी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. या दोघांनीही आम्हा भावंडांना केवळ संशोधनाची शिस्तच लावली नाही तर भरभरुन स्नेहही दिला. त्यांच्या या स्नेहपूर्ण ऋणातून उतराई होणे अशक्यच आहे. प्रस्तुत ग्रंथासाठी पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचेही बहुमोल सहकार्य लाभले.

पुणे विद्यापीठास सादर केलेल्या प्रबंधाचे परीक्षक डॉ. शशिकांत सावंत (उज्जैन) व डॉ. श्रीधर शनावरे (नागपूर) यांनी केलेल्या सूचना उपयुक्त ठरल्या. पुणे विद्यापीठातील प्रा. डॉ. मनोहर जाधव, प्रा. सतीश कुलकर्णी तसेच सरस्वती मंदिर नाईट कॉलेजचे सर्व सहकारी प्राध्यापक यांनीही जे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या ग्रंथाच्या मुद्रणाची जबाबदारी श्री. कैलास टिळेकर यांनी सांभाळली त्याबद्दल त्यांचे आभार. श्री. मा. वि. वेदपाठक यांनीही सहकार्य केले. या ग्रंथासाठी पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, म. सा. प. चे ग्रंथालय आणि शासकीय ग्रंथालय, पुणे यांचा मोलाचा हातभार लागला. उपरोक्त सर्वांच्या सहकार्यातून हा ग्रंथ सिध्द झाला आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार !

डॉ. विवेकानंद सुभाष ससाणे
३११/३, ससाणेनगर, हडपसर
पुणे ४११०२८.



Scanned by CamScanner

मला 'श्रीगणेशा' शिकविणारे
माझे आजोबा-
कै.अर्जुनराव खुंडजी ससाणे
यांच्या पवित्र स्मृतीस ....



Scanned by CamScanner

## अ नु क्र म णि का


| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ | कृ. ब. निकुंब यांचे वाड.मयीन व्यक्तिमत्त्व | ...१ |
| प्रकरण २ | कृ. ब. निकुंब यांची कविता | ...२८ |
| प्रकरण ३ | मृगावर्त : एक वैशिष्ट्यपूर्ण खंडकाव्य | ...१७२ |
| प्रकरण ४ | समकालीन कवी | ...२०१ |
| प्रकरण ५ | निकुंबांची काव्यसमीक्षा | ...२३४ |
| | परिशिष्ट्ये | ...२८५ |




Scanned by CamScanner

प्रकरण १ले

# कृ. ब. निकुंब यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

## प्रास्ताविक-

साहित्य म्हणजे साहित्यिकाच्या मानसिक सृष्टीचा म्हणजेच त्याच्या कलात्मक मनाचा आविष्कार असतो. या आविष्कारातून साधली जाणारी ललित साहित्यकृतीची निर्मिती स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जपणारी असते. साहित्यकृतीचे अस्तित्व स्वतंत्र असले तरी साहित्यिकाचे व्यक्तित्व समाजनिरपेक्ष असू शकत नाही. साहित्यकृतीच्या निर्मितीच्या प्रेरणा, त्याद्वारे मांडला जाणारा अनुभव, त्याचबरोबर साहित्यकृतीचे अस्तित्व इ. अनेक घटक हे जीवनसापेक्षच असतात. साहित्यिकाने आपल्या कलाकृतीद्वारे मांडलेला अनुभव हा त्याला बहुतांशी समाजजीवनातूनच आलेला असतो. साहित्यिक त्याच्या समकालीन सामाजिक, वैचारिक जाणिवांशी संवादी, विरोधी अथवा तटस्थ भूमिका घेत असतो. या जाणिवांतून होणारे संस्कार त्याला घडवित असतात. बाल्य, कुमारावस्था, तारुण्य, वृद्धावस्था अशा जीवनाच्या विविध टप्प्यांमध्ये या संस्काराचे स्वरुप आणि व्यक्तीवर त्याचे होणारे परिणाम वेगवेगळे असू शकतात. साहित्यिक अथवा कुठल्याही व्यक्तीवर या संस्कारांचा कमी-अधिक प्रमाणात ठसा उमटत असतो. या संस्कारांच्या कक्षेत त्याने घेतलेले जीवनानुभव त्याच्या चरित्राचा भाग बनतात.त्याच्या जीवनदृष्टीवर अनुकूल अथवा प्रतिकूल प्रभाव पाडत असतात. या गुंतागुंतीच्या प्रक्रियेतूनच साहित्यिकाचे व्यक्तित्व सिद्ध होत असते. साहित्यिक आणि साहित्यकृती यांच्यातील कार्यकारणसंबंध स्पष्ट होण्यासाठी त्याच्या



Scanned by CamScanner

# संदर्भग्रंथ सूची


अत्रे प्रभाकर - 'कुसुमाग्रज', मॉडर्न बुक डेपो, पुणे - १९६१

अनिल -'फुलवात', वाग्विलास मंडळ, पुणे - १९३२
'पेर्ते व्हा', व्हीनस प्रकाशन, पुणे - १९४९

आचवल माधव - 'जास्वंद' मौज प्रकाशन, मुबंई - १९७४

आरती प्रभू - 'जोगवा' मौज प्रकाशन गृह, मुबंई -१९५९
'दिवेलागण' मौज प्रकाशन गृह, मुंबई -१९६२
'नक्षत्राचे देणे' मौज प्रकाशन गृह, मुंबई - १९७५

कवठेकर बाळकृष्ण - 'वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा', नवसाहित्य प्रकाशन बेळगाव, १९७८

करंदीकर (विंदा) गो.वि. - 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र 'मौज प्रकाशन गृह, मुंबई - १९५७
'परंपरा आणि नवता', पॉप्युलर प्रकाशन मुबंई - १९६७
'मृद्‌गंध', पॉप्युलर प्रकाशन, मुबंई - १९६१
'स्वेदगंगा' देशमुख आणि कंपनी, पुणे १९५८
'ध्रुपद' पॉप्युलर प्रकाशन, मुबंई - १९६१.

कऱ्हाडे सदा - 'काव्यचिंतन', शलाका प्रकाशन, मुबंई, १९९७

काळे अक्षयकुमार - 'कविता कुसुमाग्रजांची' साहित्य-प्रसार केंद्र, नागपूर १९८६

कुरुंदकर नरहर - 'धार आणि काठ', देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७५

कुलकर्णी गो.म. -'आधुनिक मराठी कविता - काही रुपे : काही रंग ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - १९९१

कुलकर्णी वा.ल. - 'वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोण,' पॉप्युलर प्रकाशन, मुबंई, १९५९
- 'वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी,' पॉप्युलर प्रकाशन, मुबंई, १९६०
' साहित्य : स्वरुप आणि समीक्षा', पॉप्युलर प्रकाशन, मुबंई, १९७५
'मराठी कविता- जुनी आणि नवी', पॉप्युलर




Scanned by CamScanner